**ठळक बातम्या**

- जीएसटीचे सुधारित दर अंमलात येण्यापूर्वी उत्पादित किंवा विक्री न झालेल्या वस्तूंची सुधारित दरांसह डिसेंबरअखेरपर्यंत विक्री करण्याची केंद्र सरकारची मुभा

- भारत आणि अमेरिका हे नैसर्गिक भागीदार असून एकमेकांचे जवळचे मित्र असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- नेपाळच्या प्रधानमंत्री पदासाठी माजी सरन्यायाधीश सुशिला कार्की यांच्यासह विविध नावांची चर्चा

**आणि**

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेतल्या संयुक्त अरब अमिरातीविरुद्धच्या सामन्यात नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करायचा भारताचा निर्णय

**<><><><><>**

जीएसटीच्या कमी होणाऱ्या दरांची अंमलबजावणी सुरू होण्यापूर्वी उत्पादित केलेल्या किंवा विक्री न झालेल्या वस्तूंची सुधारित किंमतीवर ३१ डिसेंबरपर्यंत विक्री करण्याची मुभा केंद्र सरकारनं उत्पादकांना दिली आहे. यासंदर्भातलं परिपत्रक केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयानं आज जारी केलं. कंपन्यांना जुन्या मालावर नवीन किंमत छापून किंवा नव्या किंमतीचे स्टिकर लावून त्यांची विक्री करता येईल. हे करताना जुनी किंमत दिसत राहील याची खबरदारी घेण्याची सूचनाही मंत्रालयानं केली आहे. जीएसटीच्या दरांमध्ये झालेल्या फरकाचा फायदा ग्राहकांना पूर्णपणे होईल, याची

विक्रेत्यांनी खबरदारी घ्यावी, असं सरकारनं स्पष्ट केलंय. बदललेल्या विक्री किंमतीची माहिती किमान दोन वेळा वृतपत्रात प्रसिद्ध करावी, वजन मापे नियंत्रकांनाही याची माहिती द्यावी, असंही सरकारनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील अर्थविषयक मंत्रिमंडळाच्या समितीने भागलपूर-डुमका-रामपुरहाट या १७७ किलोमीटर अंतराच्या रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणाला मंजुरी दिली आहे. यासाठी अंदाजे ३ हजार १६९ कोटी रुपये खर्च येणार आहे. तसंच बिहारमधल्या बक्सर - भागलपूर हायस्पीड कॉरीडॉरच्या मोकमा-मुंगेर या ८२ किलोमीटरच्या भागालाही मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी ४ हजार ४४७ कोटी खर्च येणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांच्याशी आज दूरध्वनीवरुन चर्चा केली. युक्रेनमधला संघर्ष लवकर थांबावा, अशी इच्छा, तसंच भारत-इटली धोरणात्मक भागीदारी दृढ करण्यासाठी कटीबद्धता दोन्ही नेत्यांनी व्यक्त केली. भारत युरोप व्यापार करार मार्गी लावण्यात इटलीनं सक्रीय पाठिंबा दिल्याबद्दल मोदी यांनी प्रशंसोद्धगार काढले.

**<><><><><>**

नॉर्वेच्या प्रधानमत्री पदी जोनास गर स्टोर यांची पुन्हा निवड झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचं अभिनंदन केलं आहे. भारत आणि नॉर्वे यांच्यातली भागीदारी अधिक दृढ करण्यासाठी स्टोर

यांच्यासोबत काम करण्यासाठी आपण इच्छुक असल्याचं मोदी यांनी समाजमाध्यमात म्हटलं आहे.

**<><><><><>**

निवृत्तीवेतनाबाबतच्या समस्या हाताळताना अधिक नागरिक केंद्रित दृष्टिकोन ठेवावा, असं आवाहन केंद्रीय आस्थापना, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्तीवेतन मंत्री जितेंद्र सिंग यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत १४ व्या अखिल भारतीय पेन्शन अदालतीत बोलत होते.

निवृत्ती वेतनधारकांच्या समस्या सोडवणं आणि त्यांच्या गरजांची पूर्तता करणं ही संबंधित खात्यांची जबाबदारी आहे. त्यामुळे एकदा समस्या सोडवल्यानंतर त्यांची पुनरावृत्ती होणार नाही, याची खबरदारी घ्यावी, असे निर्देश त्यांनी संबंधित विभागांना दिली. तक्रारींचा निपटारा जलदगतीनं व्हावा यासाठी तथ्यं आणि कागदपत्रांची पडताळणी करण्याकरता कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करावा, अशी सूचना त्यांनी केली.

**<><><><><>**

नवी दिल्लीत भारत मंडपम इथे आदी संस्कृती या जगातल्या पहिल्या डिजिटल आदिवासी विद्यापीठाचं आज आदिवासी व्यवहार राज्यमंत्री दुर्गादास उईके यांच्या हस्ते उद्घाटन झालं. आदिवासी कला, संस्कृती, हस्तकला आणि ज्ञानस्रोतांसाठी आदी संस्कृती हे एक डिजिटल माध्यम आणि ऑनलाईन बाजारपेठ असल्याचं उईके यावेळी म्हणाले. आदिवासींचा वारसा जतन करण्याचा उद्देश हा केवळ संस्कृतीच्या रक्षणापुरता मर्यादित नसून तिची प्रतिष्ठा राखणं, तळागाळापासून तिचं सक्षमीकरण करणं आणि

त्यातून नव्या संधींचा शोध घेणं, अशी त्याची व्याप्ती असल्याचं उईके म्हणाले.

**<><><><><>**

पंजाबच्या पूरग्रस्त भागात मदतीसाठी अतिरीक्त अर्थसहाय्य दिलं जाईल, अशी माहिती राज्यपाल गुलाबचंद कटारिया यांनी आज दिली. मोहाली इथं बातमीदारांशी ते बोलत होते. पंजाबच्या पूरपरिस्थतीबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चेनंतर अर्थसहाय्य देण्याचं आश्वासन दिल्याचं कटारिया यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारत आणि अमेरिका हे नैसर्गिक भागीदार असून एकमेकांचे जवळचे मित्र आहेत, असं मत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं आहे. दोन्ही देशांमध्ये व्यापार विषयक चर्चेतून विलक्षण संधीचं दार उघडलं जाणार आहे. दोन्ही देशांची शिष्टमंडळं या क्षेत्रात परस्पर सहमतीच्या जवळ पोहोचण्यासाठी काम करत आहेत, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या समाजमाध्यमावरल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. उज्वल आणि समृद्ध भविष्यासाठी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळण्याची अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली असून आपण लवकरच ट्रम्प यांच्याबरोबर चर्चा करणार असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

त्याआधी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीद्वारे आपण संवाद साधणार असून दोन्ही देशांमधील चर्चा यशस्वी होण्यात काही अडचण येईल, असं आपल्याला वाटत नसल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं होतं.

**<><><><><>**

रशियाकडून तेल विकत घेत असलेल्या भारत आणि चीनकडून केलेल्या आयातीवर १०० टक्क्यांपर्यंत अतिरीक्त शुल्क लादण्याचं आवाहन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युरोपियन महासंघाला केलं आहे. वॉशिंग्टनमध्ये अमेरिका आणि युरोपियन महासंघाच्या बैठकीत ट्रम्प यांनी हे आवाहन केलं.

**<><><><><>**

मॉरिशस हा भारतासाठी विश्वासार्ह भागीदार असून इथं मोठ्या व्यावसायिक संधी आहेत. दोन्ही देशांमधले ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक नातेसंबंध अधिक दृढ करण्याचं आवाहन मॉरिशसचे प्रधानमंत्री डॉ.नवीनचंद्र रामगुलाम यांनी केलं. मुंबईत आयोजित व्यावसायिक परिषदेत ते बोलत होते.

विशेष आर्थिक क्षेत्र उभारण्यासाठी मॉरिशस सरकार वचनबद्ध असल्याचं सांगत हे क्षेत्र भारतीय कंपन्यांसाठी नवीन संधी-क्षेत्र ठरेल, असं रामगुलाम यांनी सांगितलं. भविष्यकाळातल्या अनिश्चिततेला तोंड देण्यासाठी उभय देशांत परस्पर भागीदारी अत्यावश्यक असल्याचं ते म्हणाले. सागरी अर्थव्यवस्थेतील मासेमारी, समुद्री ऊर्जा आणि बंदर विकासासाठी त्यांनी भारताच्या सहकार्याची अपेक्षा रामगुलाम यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

नेपाळमध्ये सत्तांतरच्या हालचालींना वेग आला आहे. नवं सरकार स्थापन करण्यासाठी अनेक नावं समोर येत आहेत. काठमांडू इथं आज सकाळी झालेल्या युवा प्रतिनिधींच्या बैठकीत अंतरिम सरकारच्या प्रमुख

म्हणून माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की यांचं नाव सुचवण्यात आलं होतं. मात्र या नावाला अनेकांनी विरोध दर्शवत जोरदार निदर्शनं केली. काठमांडूचे महापौर बालेन्द्र शाह यांच्याही नावाची जोरदार चर्चा आहे. विद्यमान संसद विसर्जित केल्याशिवाय सरकारमध्ये सहभागी व्हायला त्यांनी नकार दिल्याचं वृत्त आहे. धरान शहराचे महापौर हरक राज सपांग राय, दुर्गा परसाई यांनीही लष्कर प्रमुखांची भेट घेतल्याचं वृत्त आहे. पण देशातल्या सद्यस्थितीची चर्चा करण्यासाठी ही भेट होती, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

माजी राष्ट्रपती आणि त्यांच्या विधवा पत्नी यांना द्यायचे सर्व भत्ते बंद करण्याचा निर्णय श्रीलंकेच्या संसदेनं घेतला आहे. १५१ विरुद्ध १ मतानं हे विधेयक श्रीलंकेच्या संसदेत मंजूर झालं. यामुळं माजी राष्ट्रपतींना सरकारी निवासस्थान, निवृत्तीवेतन, वाहन, कर्मचारी आणि विधवा पत्नीला निवृत्तीवेतन मिळणार नाही.

**<><><><><>**

नवी दिल्लीतल्या एम्स अर्थात ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसने विद्यार्थ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी तसंच मानसिक आरोग्याविषयी जागृती करण्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्ता आधारित ‘नेव्हर अलोन’ या उपक्रमाला सुरुवात केली. यानुसार व्हॉट्सअपद्वारे मानसिक आरोग्य तज्ञांचं मार्गदर्शन चोवीस तास उपलब्ध असेल. या उपक्रमा अंतर्गत पाच हजार विद्यार्थी असलेल्या संस्थेकरता ७० पैसे प्रति विद्यार्थी दराने आरोग्य तपासणी केली जाईल.

**<><><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत दुबई इथं होत असलेल्या संयुक्त अरब अमिरातीबरोबरच्या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. या स्पर्धेतला भारताचा हा पहिलाच सामना आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा संयुक्त अरब अमिरातीच्या २ षटकात बिन बाद १६ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात दहशतवादविरोधी कार्यगटाची बैठक काल ब्रुसेल्स इथं झाली. या बैठकीत पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यात आला. या हल्ल्यात मरण पावलेल्यांप्रति युरोपियन युनियनने सहवेदना व्यक्त केली.

**//<><><><><>//**